# वसई-विरार शहर महानगरपालिका
## पाणीपुरवठा विभाग

दि.०८/०५/२०२४

## प्रेसनोट

वसई - विरार शहर महानगरपालिकेस सुर्या टप्पा-१ व ३ या योजनेतुन २०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतून १०० द.ल.ली. पाणी पुरवठा होत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जुन्या सुर्या योजनेच्या मुख्य जलवाहिनीवर तसेच शहरातील वितरण वाहिन्यांवर क्रॉस कनेक्शनची व विकास कामे शुक्रवार दि.१०/०५/२०२४ रोजी करावयाची आहेत.

तरी उपरोक्त कामाकरीता जुन्या सुर्या योजनेतून होणारा संपूर्ण पाणीपुरवठा दि. १०/०५/२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजेपासून ते दि.११/०५/२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत असा एकूण २४ तास बंद ठेवण्यात येणार असून महापालिकेच्या नविन सुर्या योजनेअंतर्गत व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या योजनेअंतर्गत होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे. त्यामुळे शहरास पुढील २ दिवस अनियमीत अथवा कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे याची नागरीकांनी नोंद घ्यावी. उपलब्ध पाणी जपुन वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे हि विनंती.

**पाणीपुरवठा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**